# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

लोकमत

पुणे, मंगळवार, दि. २९ ऑगस्ट २०१७ २

### नवभारत का मंथन-संकल्प अभियान

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : विद्यार्थी-युवकांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील थोरांचे योगदान, हुतात्मा, शहिदांच्या आठवणींना उजाळा, भारतीय स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा, राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ करण्यासाठी राजगुरुनगर येथे मंगळवार ते गुरुवारपर्यंत (दि. २९ ते ३१) तीनदिवसीय नवभारत का मंथन-संकल्प से सिद्धी या विषयावर विशेष प्रचार अभियान होणार आहे.

१८५७ ते १९४७ या भारतीय स्वातंत्र्यलढ्याची यशोगाथा, तसेच नवभारताच्या निर्मितीत सर्वांच्या योगदानातून सन २०२२ पर्यंत स्वच्छ भारत, गरिबीमुक्त भारत, भ्रष्टाचारमुक्त भारत, दहशतवादमुक्त भारत, संप्रदायमुक्त भारत, जातिवादमुक्त भारत करण्यासाठी संकल्प करून प्रतिज्ञा घ्यावयाची आहे. पहिल्या व दुसऱ्या दिवशी (दि. २९ व ३०) मौखिक, रांगोळी, निबंध, चित्रकला स्पर्धा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

04 प्रभात पुणे

# तरुणांनी देशविकासात महत्त्वाची भूमिका बजावावी

## आमदार गोरे यांचे आवाहन : 'संकल्प से सिद्धी : नवभारत का मंथन' अभियानाचा समारोप

राजगुरुनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) - देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक तरुणांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन तरुणांनी देशाच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजवावी, असे आवाहन आमदार सुरेश गोरे यांनी राजगुरुनगर येथे केले.

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात केंद्रिय माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत क्षेत्रिय प्रचार संचालनालयाच्या वतीने आयोजित संकल्प से सिद्धी 'नवभारत का मंथन' या अभियानाच्या समारोप प्रसंगी आमदार सुरेश गोरे यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, तहसीलदार सुनील जोशी, राज्याचे सहायक माहिती अधिकारी मिलिंद भिंगारे, क्षेत्रिय प्रचार अधिकारी माधव जायभाय, कांदा लसूण संशोधन केंद्राचे संचालक डॉ. मेजर सिंग, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एन. एम. ओ., प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश वाडेकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिक पाटोळे, मालती सातकर, सुभाष गाढवे आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

> संकल्प से सिद्धी या अभियानात सर्वांना सहभागी होण्याचे आवाहन करीत विविध विषयांवर मंथनाबरोबरच निर्मितीची गरज आहे. तसेच या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळणार आहे.
>
> –ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, अध्यक्ष खेड ता. शिक्षण प्रसारक मंडळ

आमदार गोरे म्हणाले, देशाची जबाबदारी तरुणांवर आहे. देशात समाजात वावरताना आपल्यावरील जबाबदारीची जाणीव ठेवून आपले कर्तव्य बजावले पाहिजे. सिंगापूर अधिक लोक तरुण आहेत. त्यांच्याकडून देशहिताची कामे होणे गरजेचे आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेले संकल्प से सिद्धी : नवभारत का मंथन अभियानामुळे युवा पिढीला चालना मिळेल. त्यांना व्यासपीठ मिळेल.

या अभियानांतर्गत रांगोळी, चित्रकला, निबंध आणि मुलामुलींच्या मौखिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यातील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व कोल्हा भेट देऊन गौरविण्यात आले. स्वच्छ भारत, गरिबीमुक्त, भ्रष्टाचारमुक्त, आतंकवादमुक्त, जातिवादमुक्त भारताचा संकल्प करण्यात आला. २०२२ सालापर्यंत या संकल्पाची सिद्धी होण्यासाठी सर्वांनी तन-मन-धन अर्पून एकजुटीने प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा करण्यात आली.

प्रा. रवी चौधरी यांनी मी राजगुरु बोलतोय या विषयावर तर कु. अनिकेत आवटे याने मी भारत बोलतोय या विषयावर एकपात्री नाटीकरण केले. भारत सरकारच्या गीत व नाटक विभागाच्या वतीने शाहीर बापू पवार, मीरा दळवी व सहकाऱ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. या महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने देशभक्तीपर गीतगायन व पुस्तविक्री सादर करण्यात आला. नवे भारत का संकल्प प्रतिज्ञेचे वाचन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधव जायभाय यांनी, सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी मानले.



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात संकल्प से सिद्धी 'नवभारत का मंथन' या अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या विविध उपक्रमात प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना आमदार सुरेश गोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शेजारी देवेंद्र बुट्टेपाटील व मान्यवर.

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**



माय पुणे जिल्हा उत्तर ५ पुढारी

# संकल्प से सिध्दी : नवभारत का मंथन अभियानाचे आयोजन

## देशाच्या जडणघडणीत तरुणांचे योगदान महत्त्वाचे : आमदार सुरेश गोरे

आमदार सुरेश गोरे मार्गदर्शन करताना.

राजगुरुनगर : प्रतिनिधी

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक तरुणांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यापासून प्रेरणा घेऊन तरुणांनी देशाच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजवावी, असे आवाहन आमदार सुरेश गोरे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत क्षेत्रीय प्रचार संचालनालयाच्या वतीने आयोजित संकल्प से सिध्दी नवभारत का मंथन अभियानाच्या समारोपप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, तहसीलदार सुनील जोशी, राज्याचे सहायक माहिती अधिकारी मिलिंद भिंगारे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश वाडेकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अॅड. माणिक पाटोळे, आगरकर, क्षेत्रीय प्रचार अधिकारी माधव जायभाय, कांदा लसूण संशोधन केंद्राचे संचालक डॉ. मेजर सिंग, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी संकल्प से सिध्दी या अभियानात सर्वांना सहभागी होण्याचे आवाहन करताना विविध विषयांवर मंथनाबरोबरच निर्मितीची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

या अभियानांतर्गत रांगोळी, चित्रकला, निबंध आणि मुलामुलींच्या [illegible] स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यातील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व फोल्डर भेट देऊन गौरविण्यात आले.

या अभियानाच्या निमित्ताने स्वच्छ भारत, गरिबीमुक्त, भ्रष्टाचारमुक्त, आतंकवादमुक्त, जातीयवादमुक्त भारताचा संकल्प करण्यात आला. २०२२ सालापर्यंत या संकल्पाची सिध्दी होण्यासाठी सर्वांनी तन-मन-धन पूर्ण एकजुटीने प्रयत्न करण्याचे ठरले.

या प्रसंगी प्रा. रवी चौधरी यांनी मी राजगुरु बोलतोय या विषयावर तर कु. अनिकेत आवळे याने मी भारत बोलतोय, या विषयावर एकपात्री सादरीकरण केले.

भारत सरकारच्या गीत व नाटक विभागाच्या वतीने शाहीर बापू पवार, मीरा दळवी व सहकाऱ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली, तर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने देशभक्तीपर गीतगायन व नृत्याविष्कार सादर करण्यात आला.

या वेळी नये भारत का संकल्प प्रतिज्ञेचे वाचन डॉ. संजय शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधव जायभाय यांनी, सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी, तर आभार प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी मानले.

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

सकाळ

१०

राजगुरुनगर (ता. खेड) : केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत क्षेत्रीय प्रचार संचालनालयाच्या वतीने आयोजित अभियानाच्या समारोपप्रसंगी बोलताना आमदार सुरेश गोरे.

### तरुणांनी देशाच्या उन्नतीस हातभार लावावा : गोरे

राजगुरुनगर, ता. ३ : "भारताला बलशाली बनविण्याची जबाबदारी तरुणांवर असून, त्यासाठी त्यांनी हुतात्म्यांपासून प्रेरणा घेऊन देशाच्या उन्नतीस हातभार लावावा," असे आवाहन खेडचे आमदार सुरेश गोरे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत क्षेत्रीय प्रचार संचालनालयाच्या वतीने आयोजित 'संकल्प से सिद्धी, नवभारत का मंथन' अभियानाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिक पाटोळे, उमेश आगरकर, कांदा लसूण संशोधन केंद्राचे संचालक डॉ. मेजर सिंग, तहसीलदार सुनील जोशी, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य जी.जी. गायकवाड, व्यवस्थापक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते.

आमदार गोरे म्हणाले, "देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आधीच्या पिढीतील तरुणांनी आपल्या प्राणांचीही आहुती दिली. सध्याच्या तरुणांनी जबाबदारीने वागून देशाच्या प्रगतीस हातभार लावून संपन्न आणि समर्थ देश उभा केला पाहिजे."

दोन दिवस चाललेल्या या अभियानात रांगोळी, चित्रकला, निबंध आणि मुला-मुलींच्या मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यातील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी प्रा. रवी चौधरी यांनी 'मी राजगुरू बोलतोय' या विषयावर, तर अनिकेत आखाडे याने 'मी भारत बोलतोय' या विषयावर एकपात्री प्रयोग सादर केला.

भारत सरकारच्या गीत व नाटक विभागाच्या वतीने देशभक्तिपर गीते सादर करण्यात आली. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने देशभक्तिपर गीतगायन व नृत्याविष्कार सादर करण्यात आला. माधव जायभाय यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आभार मानले.

लोकमत

पुणे, सोमवार, दि. ४ सप्टेंबर २०१७ | २

### देशाच्या विकासात तरुणांचे योगदान महत्त्वाचे : गोरे

**संकल्प से सिद्धी : नवभारत का मंथन अभियानाचे आयोजन**

लोकमत न्यूज नेटवर्क



विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करताना.

[illegible]

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख